**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित**

**परिमंडल कार्यालयांची जाहिरात क्र. ०२/२०१६ व कळवा कार्यालयाची जाहिरात क्र. ०१/२०१६ अंतर्गत 'तंत्रज्ञ श्रेणी-४' या पदावर नेमणूक करण्यासाठी तात्पुरती निवड करण्यात आलेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्याबाबत.**

**संदर्भ :** दि.१०.१०.२०१७ रोजी परिमंडल निहाय प्रसिध्द करण्यात आलेल्या तात्पुरत्या निवड /प्रतिक्षा यादया.

----------

महापारेषण कंपनीच्या विविध परिमंडल कार्यालयांनी प्रसारित केलेल्या जाहिरात क्र.०२/२०१६ व भार प्रेषण केंद्र, कळवा कार्यालयाने प्रसारित केलेल्या जाहिरात क्र. १/२०१६ अन्वये 'तंत्रज्ञ श्रेणी-४' या पदासाठी दिनांक १०.१०.२०१७ च्या अधिसूचनेद्वारे प्रसिध्द करण्यात आलेल्या तात्पुरत्या निवड / प्रतिक्षा याद्यांमधील उमेदवारांना सदर अधिसूचनेमधील अटी व शर्तींच्या अधीन राहून मूळ कागदपत्रांच्या पडताळणीकरिता बोलविण्यात येत आहे.

२. त्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, सदरहू अधिसूचनेमध्ये नमूद केलेल्या **परिमंडल निहाय तात्पुरत्या निवड सूचीतील उमेदवारांनी दि. २३.१०.२०१७ ते दि. २५.१०.२०१७ रोजी परिमंडल कार्यालयात** खाली नमूद केलेले **मूळ कागदपत्रे** व **त्यांच्या साक्षांकीत छाया प्रतींच्या एक संचासह** कार्यालयीन वेळेत हजर राहून कागदपत्रांची पडताळणी करून घेणे आवश्यक आहे.

- शिकाऊ उमेदवारी कायदा-१९६१ अंतर्गत राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCTVT), नवी दिल्ली यांनी प्रदान केलेले वीजतंत्री या व्यवसायातील राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रमाणपत्र

**किंवा**

- औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडून वीजतंत्री व्यवसायातील पाठ्यक्रम पूर्ण केल्यानंतर राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCTVT), नवी दिल्ली यांनी प्रदान केलेले वीजतंत्री या व्यवसायातील राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र
- जन्मतारीखे करीता एस.एस.सी. प्रमाणपत्र / शाळा सोडल्याचा दाखला
- जातीचा दाखला (मागास प्रवर्गातून अर्ज केल्यास)
- जाती वैधता प्रमाणपत्र ( असल्यास-मागास प्रवर्गातून अर्ज केल्यास )
- नॉन क्रिमिलिअर प्रमाणपत्र (मागास प्रवर्गातून अर्ज केल्यास /लागू असल्यास)
- महाराष्ट्र अधिवास प्रमाणपत्र
- अपंगत्वाचे प्रमाणपत्र (अपंग आरक्षणासाठी अर्ज केल्यास)
- भुकंपग्रस्त प्रमाणपत्र (भुकंपग्रस्त आरक्षणासाठी अर्ज केल्यास)
- माजी सैनिक प्रमाणपत्र (माजी सैनिक आरक्षणासाठी अर्ज केल्यास)
- खेळाडू प्रमाणपत्र (खेळाडू आरक्षणासाठी अर्ज केल्यास)
- मराठी भाषा प्रमाणपत्र (जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे)
- नावातील बदलाचे प्रमाणपत्र (बदल केला असल्यास /लागू असल्यास)
- 'वीजतंत्री' या व्यवसायातील उमेदवारी पूर्ण केल्याबाबतचे तदर्थ म.रा.वि. मंडळ / महापारेषण कंपनीने जारी केलेले वैध प्रमाणपत्र (अॅप्रेंटीसशीपबद्दल अर्जात उल्लेख केला असल्यास)
- संबंधीत जिल्हाधिकारी / जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी जारी केलेले प्रकल्पग्रस्त (महापारेषण प्रकल्पग्रस्त) असल्याबाबतचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र

३. कागदपत्र पड़ताळणीस हजर राहण्याबाबत प्रत्येक उमेदवारास त्याने ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या ई-मेल पत्यावर पत्र पाठविण्यात येत आहे. पत्र प्राप्त झाल्यानंतर त्याची पोच ई-मेलद्वारे देण्यात यावी. तसेच, उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या मोबाईलद्वारे सुध्दा कळविण्यात येत आहे.

४. जर सदर पडताळणी करिता उमेदवार हजर न राहिल्यास सदर उमेदवार निवडी करिता पात्र समजला जाणार नाही याची कृपया गांभीर्याने नोंद घेण्यात यावी.

५. कागदपत्र पडताळणीकरीता उमेदवारास बोलाविण्यात आले म्हणून त्यांना नेमणूक मिळण्याबाबतचा कोणत्याही प्रकारचा हक्क प्राप्त होत नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

६. तात्पुरत्या प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना संबंधित परिमंडल कार्यालयाकडून आवश्यकता असल्यास सुचित केले जाईल. त्यामुळे त्यांनी परिमंडल कार्यालय किंवा मुख्य कार्यालयास संपर्क करू नये.

**दिनांकः- १७.१०.२०१७** **मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

*************